| MHNS130011012022 | दाखल दिनांक | १२.१०.२०२२ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | १२.१०.२०२२ |
| | निकाल दिनांक | २३.०३.२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०३ ०५ ११ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपळगाव(बसवंत), ता. निफाड जि.नाशिक यांचे न्यायालय**

**( पिठासीन अधिकारी — व्ही.डब्ल्यू.खेंदाड )**

**:: न्यायनिर्णय ::**

( दिनांक —२३/०३/२०२६ अधिघोषित )

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५२५/२०२२** **निशाणी क्र.०८ पुढे**

**सरकार वि. सुदाम अमरसिंग चव्हाण**

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरूध्द महाराष्ट्र प्रोव्हिबीशन कायदा कलम ६५(ई) प्रमाणे प्रतिकथन नि.क्र.०८ वर नोंदवून आरोपीस वाचून व त्याच्या भाषेत समजावून सांगण्यात आला असता, आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे निवेदन सांगुन खटला चालवण्याची मागणी केली. प्रस्तुत गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने तीन साक्षीदाराची साक्ष नोंदविली. त्यानंतर पुरेशी संधी देवून देखील अभियोग पक्षाने गुन्हा सिध्द करण्याकामी पुढे एकही साक्षीदाराचा साक्षी पुरावा नोंदविलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. तद्नंतर तपासलेल्या साक्षीदाराच्या साक्षी पुराव्यात आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द होण्याइतपत पुरावा आढळून आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आला. त्यात आरोपीने सर्व कथने नाकारली असून खोटा गुन्हा दाखल केल्याचा बचाव घेतला आहे. आरोपीने त्याच्या बचावाच्या पृष्टयर्थ तोंडी अथवा लेखी पुरावा सादर केलेला नाही.

२. अभियोग पक्षाच्या कथनावरुन खालील मुददे उपस्थित होतात. त्यावर माझे निष्कर्ष कारणमीमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.२७.०८.२०२२ रोजी सकाळी १५.३० वाजेच्या सुमारास मुंबई आग्रा हायवे रोडलगत असणा—या आकाश हॉटेलचे पाठीमागे मोकळया जागी आडोशाला, पिंपळगाव बं. ता.निफाड, जि.नाशिक येथे आरोपी हा | ... **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| | प्रिन्स संत्रा कंपनीच्या १८० मिली मापाच्या ११ सिलबंद बाटल्या असा एकूण रु.७७०/— किंमतीचा दारुबंदी गुन्हयाचा माल स्वत:चे कब्जात विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळून आला ? | |
| २. | अंतिम आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

३. अभियोगपक्षातर्फे विद्वान सरकारी अभियोक्ता श्री.एस.एल.जोरवर आणि आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.पी.बी.हाडोळे यांचा मौखिक युक्तिवाद ऐकला. पटलावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

## :: का र ण मि मां सा ::

**मुद्दा क्र. १ व २ करिता :**

४. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी आरोपी हा दारुबंदी गुन्हयाचा माल विक्री करण्याच्या उद्देशाने स्वत:चे कब्जात बाळगतांना मिळून आला, ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

५. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार — भाउसाहेब हरी धात्रक (सा.क्र.१) हे फिर्यादी असून त्यांनी त्यांचा पुरावा हा त्यांच्या फिर्यादशी सुसंगत असा दिलेला आहे. सदर साक्षीदाराने आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये मान्य केले की, सरतपासात सांगितल्याप्रमाणे घटना घडली आहे. पुढे त्यांनी पोलीस स्टेशनला दिलेली फिर्याद वाचली होती, सरतपासात सांगितल्याप्रमाणे ४ ते ५ इसम दारु विकत घेतांना दिसल्याचे त्यांनी फिर्याद देतांना सांगितले होते, त्यापैकी चार लोकांना त्यांनी पकडल्याचे ठाणे अंमलदार यांना फिर्याद देतांना सांगितले होते, त्यांनी चार इसमांना पकडून त्यांच्याकडे विचारणा केली असता ते केवळ दारु खरेदी करण्याकरिता आल्याचे सांगितले होते ही बाब फिर्याद देतेवेळी ठाणे अंमलदार यांना सांगितली होती परंतु सदरच्या बाबी त्यांनी दिलेल्या फिर्यादीत का नाहीत याचे कारण त्यांना सांगता येणार नसल्याचे कथन केले.

६. पुढे त्यांनी मान्य केले की, त्यांनी सांगितलेले घटनास्थळ म्हणजे आकाश ढाबा हे उत्तर—दक्षिण दिशेला असलेल्या मुंबई—आग्रा महामार्ग रस्त्याच्या

पूर्वेला आहे व सदर महामार्गाच्या पश्चिमेला कृषी उत्तन्न बाजार समितीचे जुने मार्केट आहे, अशा परिस्थितीत घटनास्थळाच्या आजूबाजूला मार्केट असल्याने वर्दळीचे प्रमाण जास्त आहे. पुढे त्यांनी मान्य केले की, दारु खरेदी करत असतांना पकडलेल्या इसमांविरुध्द त्यांनी कोणतीही तक्रार दाखल केलेली नाही. पुढे त्यांनी जप्त केलेल्या ११ बॉटलचे बॅच क्रमांक त्यांनी पाहिले होते असे कथन केले. पुढे त्यांनी मान्य केले की, त्या ११ बॉटलच्या बॅच क्रमांकाचे वर्णन फिर्यादीमध्ये दिलेले नाही. याव्यतिरिक्त त्यांनी इतर सर्व कथने अमान्य केली.

७. सदर फिर्यादी (सा.क्र.१) हा पोलीस असून त्याने फिर्यादशी सुसंगत असा पुरावा दिलेला आहे. परंतु फिर्यादी (सा.क्र.१) यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केल्याप्रमाणे ४ ते ५ इसम दारु विकत घेतांना दिसले असे कथन त्यांच्या सरतपासात केले. परंतु सदर बाब त्यांच्या फिर्यादमध्ये नमूद नाही. तसेच त्यापैकी चार लोकांना त्यांनी पकडल्याचे ठाणे अंमलदार यांना फिर्याद देतांना सांगितले होते, त्यांनी चार इसमांना पकडून त्यांच्याकडे विचारणा केली असता ते केवळ दारु खरेदी करण्याकरिता आल्याचे सांगितले होते ही बाब फिर्याद देतेवेळी ठाणे अंमलदार यांना सांगितली होती या बाबी देखील त्यांच्या फिर्यादमध्ये नमूद नाहीत. तसेच दारु खरेदी करत असतांना पकडलेल्या इसमांविरुध्द त्यांनी कोणतीही तक्रार दाखल केलेली नसल्याचे मान्य केले. तसेच त्यांनी जप्त केलेल्या ११ बॉटलचे बॅच क्रमांक त्यांनी पाहिले असल्याचे कथन करुन त्यांचे बॅच क्रमांक फिर्यादमध्ये नमूद नसल्याचे मान्य केले आहे. या सर्व समावेशनांमुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही कमकुवत झालेली आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करण्याकरीता पुरेशी नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही औपचारित स्वरुपाची दिसून येते.

८. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला पोलीस साक्षीदार – संतोष ब्राम्हणे (सा.क्र.२) यांनी फिर्यादी – भाउसाहेब हरी धात्रक (सा.क्र.१) यांच्या कथनांशी सुसंगत असा पुरावा दिलेला आहे. पुढे सदर साक्षीदाराने आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये मान्य केले की, मुद्देमाल जप्त करतेवेळी तयार करण्यात आलेल्या पंचनाम्यात जप्त बाटल्यांवरील बॅच क्रमांक नमूद केले नाही. तसेच त्यांचे सरतपासातील मजकूर ''त्या इसमाकडून ४–५ लोक दारु विकत घेत होते'' ही बाब

पंचनाम्यात नमूद केलेली नाही. पुढे त्यांनी मान्य केले की, उपस्थित लोकांकडे चौकशी केली असता आरोपी आकाश ढाब्याचा मालक असल्याचे समजले ही बाब पंचनाम्यात नमूद नाही. या सर्व समावेशनांमुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही कमकुवत झालेली आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करण्याकरीता पुरेशी नाही. तसेच त्यांची साक्ष ही औपचारित स्वरुपाची दिसून येते.

९. अभियोग पक्षाच्या संपूर्ण साक्षी पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत होईल असा कोणताही पुरावा अभियोग पक्षास अभिलेखावर आणता आलेला नाही. तसेच अभियोग पक्षाने सदर प्रकरणात वारंवार संधी मिळूनही दुसरा पंच, इतर साक्षीदार व तपास अधिकारी यांची देखील साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. सदर प्रकरणात तपासी अधिका—याने पोलीस साक्षीदारांव्यतिरिक्त एकाही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शीचा साधा जबाब देखील नोंदविलेला नसल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. परिणामत: आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची बाब स्वतंत्रपणे सिध्द करण्यास अभियोग पक्षास अपयश आलेले आहे.

१०. या पार्श्वभुमीवर ही बाब नमुद करणे उल्लेखनीय ठरते की, सदर प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने जप्त नमुण्याचा रासायनिक अहवाल सादर केलेला आहे. मात्र त्यावरुन दिसून येते की, नमुना पाठविण्यास व परिक्षण करण्यास सुमारे ०२ महिन्यांचा विलंब झालेला आहे. शिवाय दरम्यानच्या काळात सदर नमुना कोणत्या अवस्थेत होता याबाबत तसेच नमुना घेतेवेळी योग्य ती प्रक्रिया नियमानुसार अवलंबिण्यात आली होती काय याबाबत कोणताही विश्वसनीय पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. शिवाय सदर मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यातून जप्त केल्याची बाब देखील विश्वसनीयपणे सिध्द करण्यास अभियोग पक्षास अपयश आलेले असल्याचा निष्कर्ष मी पूर्वीच नोंदविलेला आहे. परिणामत: मी या निष्कर्षावर आलेले आहे की, अभियोग पक्षाच्या हकिकतीस प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष वा परिस्थितीजन्य पुराव्याद्वारे पुष्टी प्राप्त होवू शकलेली नसून आरोपीवरील दोषारोपीत गुन्हयाची मुलभुत तत्वे रास्त शंकेपलिकडे सिध्द करण्यास अभियोग पक्षास अपयश आलेले आहे. यामुळे निश्चितच आरोपी रास्त शंकेचा लाभ मिळण्यास पात्र ठरतो. सबब, मी **मुद्दा क्र. १** चा निष्कर्ष **नकारार्थी** नोंदवित आहे.

**११.** ज्याअर्थी, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत केला नाही, त्याअर्थी आरोपीस सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त करणे योग्य व न्यायोचित होईल. तसेच प्रकरणात जप्त असलेला मुद्देमाल प्रिन्स संत्रा देशी दारुच्या १८० मिली मापाच्या ११ सिलबंद बाटल्या (पोलीस ठाणे मुद्देमाल पावती क्र.४०/२०२२) हया अपिल कालावधीनंतर नष्ट करणे योग्य होईल.

**१२.** संचिकेवर उपलब्ध असलेला पुरावा आहे तसा जरी स्वीकारला तरी तो अनुपस्थित आरोपीस दोषी ठरविण्यास पुरेसा नाही. त्यामुळे सदरचे प्रकरण निर्णयीत करत आरोपीची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. फौ.प्र.सं.कलम ३५३(६) मधील तरतूदी वाचल्या. फौ.प्र.सं.कलम ३५३(६) मधील तरतूदीनुसार जर आरोपी कोठडीत तसेल तर त्याला निकाल ऐकण्यासाठी न्यायालयात उपस्थित राहण्याच्या निर्देशाबाबत अट आहे. मात्र जिथे खटल्यादरम्यान त्याची वैयक्तिक उपस्थिती माफ करण्यात आली आहे आणि शिक्षा केवळ दंडाची आहे किंवा त्याची निर्दोष मुक्तता झाली आहे, अशा वेळी ही अट लागू होणार नाही. प्रस्तुत प्रकरणात आरोपी हा बंदी कैदी नाही. तसेच वरीलप्रमाणे आरोपीची निर्दोष मुक्तता करणे मुक्तता करणे न्यायोचित राहीत असे निष्कर्ष काढल्याने तसेच खटला निकालात काढण्यास गैरवाजवी विलंब होत असेल तर पिठासन अधिकारी न्यायनिर्णय अधिघोषित करु शकतात. करीता मी न्यायनिर्णय आरोपीच्या अनुपस्थितीमध्ये अधिघोषित करीत आहे. परिणामत: **मुद्दा क्र. २** च्या निष्कर्षाप्रत खालील आदेश पारीत करीत आहे;

## आदेश

१. आरोपी **सुदाम अमरसिंग चव्हाण** याची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र प्रोव्हिबीशन कायदा कलम ६५ई अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयामधुन अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन व बंधपत्रे रद्द करण्यात येत आहे व त्यास त्यातून मुक्त करण्यात येत आहे.

३. तपास अधिकारी, पिंपळगाव (बसवंत) पोलीस स्टेशन यांना आदेशित करण्यात येते की, सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल प्रिन्स संत्रा देशी दारुच्या ११ सिलबंद बाटल्या (पोलीस ठाणे मुद्देमाल पावती क्र.४०/२०२२) हया अपिल कालावधीनंतर

नष्ट करण्याकामी राज्य उत्पादन शुल्क, नाशिक यांच्याकडे पाठवावा.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) प्रमाणे निकटतम अपील न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी रक्कम रु.१५,०००/— चा जातमुचलका व वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

सही /—XXX
(व्ही.डब्ल्यू.खेंदाड)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
पिंपळगाव(बसवंत), जि.नाशिक

**दिनांक :** २३.०३.२०२६
**ठिकाण :** पिंपळगाव(बसवंत)

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.
लघुलेखकाचे नांव — श्रीमती बी.एच.गावीत.
न्यायालयाचे नाव — न्यायदंडाधिकारी वर्ग १, पिंपळगाव(बसवंत), जि.नाशिक
आदेश दिनांक : २३.०३.२०२६.
पिठासीन अधिका—यानी स्वाक्षरी केलेली तारीख : २३०३.२०२६
आदेश/न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख : २४.०३.२०२६.

**(टिप : डिजीटल सीग्नेचर मिळालेली नसल्याने न्यायनिर्णय डिजीटल स्वाक्षरीत केला नाही.)**